New International Reliable Research Journal, Vol-I, Issue 38 May 2016 ISSN - 2320-9410

**ORIGINAL ARTICLE**

# आर्थिक सुधारणा काळातील महाराष्ट्र सरकारच्या कृषी विकासाची व्यूहरचना

**डॉ.एम.एन. बिरादार**
सहयोगी प्राध्यापक व मार्गदर्शक,
दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर,
जि. नांदेड

**रमेश मारोतीराव राठोड**
संशोधक विद्यार्थी,
अर्थशास्त्र विभाग,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

**प्रस्तावना :**

राज्याच्या अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका महत्त्वाची आहे. सुरूवातीच्या काळापासून राज्याच्या उत्पन्नात वाटा, उपजीविकेचे साधन, रोजगार निर्मितीतील योगदान, औद्योगिक विकासाचा आधार, सेवा क्षेत्राचा विकास, परकीय चलनाची प्राप्ती इत्यादीमध्ये कृषीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. म्हणजेच कृषी हा संपूर्ण विकासाचा आधारआहे.

महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी व औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले राज्य असतानाही वर्ष २०११ च्या जनगणेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ५४.३ टक्के लोकसंख्या ही कृषि क्षेत्रावर अवलंबून आहे. परंतु महाराष्ट्र राज्याच्या एकूण जीडीपी मध्ये कृषिक्षेत्राचा वाटा १२.९ टक्के इतकाच आहे. याचा अर्थ महाराष्ट्र राज्यातील ५४.३ टक्के लोकांकडे १२.९ टक्के उत्पन्नाचा हिस्सा तर ४५.७ टक्के लोकांकडे ८७ टक्के हिस्सा आहे. यावरून महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांची व शेतीची समस्या ग्रस्त अवस्था स्पष्ट होते. शिवाय ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देणारे शेती हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. कृषी हा राज्य सरकारच्या अखत्यारीतील विषय असल्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासाची जबाबदारी राज्य सरकारवर येऊन पडते. तर राज्य हे केंद्राच्या अंतर्गत येत असल्या ुळे राज्याच्या विकासामुळेच देशाचा विकास शक्य आहे. म्हणून राज्याच्या विकासासाठी केंद्रशासनही शेतीसाठी व्यूहरचना आखत असते व ते सर्व राज्यांना लागू होतात. पण कृषी विकासासाठी राज्य सरकारने भरीव तरतूद करणे आवश्यक आहे. तरच कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल.

**कृषी विकासासाठी केंद्र व राज्य सरकारची व्यूहरचना :**

शेतीचा विकास करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने ज्या व्यूहरचना तयार केल्या आहेत त्यामध्ये १८९३ चे कृषी धोरण, राष्ट्रीय कृषी धोरण (२०००), राष्ट्रीय शेतकरी धोरण (२००७), जैवतंत्रज्ञान धोरण, जलधोरण, किंमत धोरण, पशुपैदाशीचे धोरण इत्यादी कृषी पुरक धोरणे व विविध कृषी विकास विषयक योजनांचा समावेश करण्यात आला आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**राष्ट्रीय कृषी धोरण (१९९३)**

आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर कृषी क्षेत्राचे महत्त्व ओळखून डिसेंबर १९९२ मध्ये भारताच्या लोकसभेत नवीन कृषी धोरणाचा ठराव सादर करून मार्च १९९३ मध्ये राज्यांच्या मुख्यमंत्र्याच्या सम्मेलनात या धोरणाचा मसुदा तयार करून राष्ट्रीय कृषी धोरण मंजूर करण्यात आले. व त्या धोरणात शेती व्यवसायाला प्रोत्साहन देणे, सहकाराला मजबूत करणे, आधारभूत संरचनेचा विकास करणे, सर्वंकष विकासाच्या सोयी यामध्ये शेतमालावर प्रक्रिया करणे, त्याची विक्री व्यवस्था, संग्रहण शेतीला पाणीपुरवठा, बागायतीचा विकास, मत्सोत्पादन, पशुधन इत्यादीचा विकास करणे, इत्यादी उद्दिष्ट्ये ठरवण्यात आली.

**राष्ट्रीय कृषी धोरण (२०००)**

आर्थिक सुधारणा काळात कृषीचा विकास दर घटल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात कृषीचा हिस्सा कमी झालेला आहे. तसेच इतर क्षेत्राच्या तुलनेत कृषीचा विकास कमी झालेला आहे म्हणून राष्ट्रीय स्तरावर कृषी धोरण राबविले व या धोरणात कृषीचा वार्षिक वृद्धिदर ४ टक्के साध्यकरणे, उपलब्ध साधन सामुग्रीचा कार्यक्षम उपयोग करून तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नियोजित शेतकऱ्यांना होईल अशी वृद्धी साध्य करणे, कृषीची आर्थिक दृष्टीने, तंत्रज्ञानाच्या व पर्यावरणच्या दृष्टीने शाश्वत वृद्धी साध्य करणे इत्यादी उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली.

**जैवतंत्रज्ञान धोरण (२००१)**

महाराष्ट्र राज्याची केवळ देशातच नव्हे तर जगात जैव तंत्रज्ञान अग्रेसर राज्य बनण्याची क्षमता आहे. शेती, पशुपालन, आरोग्य, पर्यावरण, संरक्षण, भौतिक रूपांतरण इत्यादी घटकांना प्रभावित करण्यासाठी व राज्यातील लोकांच्या जीवनमान स्तरात बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्याने जैव तंत्रज्ञान धोरण वर्ष २००१ मध्ये घोषित केले आहे व त्यामध्ये १) राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाची, अधिक उत्पादन देणारी, अवर्षण भागाशी अनुकूल असणारी व वातावरणाशी अनुकूल अशी बियाणे पुरविणे. २) पशुंसाठी मुबलक व योग्य चाऱ्याची उपलब्धता करणे. ३) राज्यातील शेतीसाठी उपयोगी पडणाऱ्या व दुग्धउत्पादक जनावरांची वाढ करणे, ४) शेतकऱ्यांना परवडण्याजोगी औषधी व इतर घटक विकसित करून उष्ण कटीबंधीय पिकांवरील रोगाचा ताण कमी करणे इत्यादी उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली.

**महाराष्ट्र राज्याचे जलधोरण (२००३)**

कृषी उत्पादनासाठी पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन राज्य सरकारने जुलै २००३ मध्ये राज्याचे धोरण घोषित केले. यामध्ये शेती क्षेत्राला सिंचित करण्यावर भर देणे, पाण्याच्या साठ्यात वाढ करणे, पाणी वापर संस्थाना पाणी हक्क कोटा निश्चित करून त्यानुंसार अंमलबजावणी करणे इत्यादी उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली आहे.

**राष्ट्रीय कृषी विमा योजना :**

शेतीचा विकास करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने विविध व्यूहरचना व योजना राबविल्या आहेत. त्यापैकी कृषी विमा योजना होय. ही योजना सन १९९९-२००० च्या रब्बी हंगापासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेचा उद्देश १) नैसर्गिक आपत्तीमध्ये तसेच किड व रोगराईचा प्रादुर्भाव झाल्यास शेतकऱ्यांना सदरील योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत देणे, २) शेतकऱ्यांच्या शेतामध्ये प्रगत तंत्रज्ञान तसेच योग्य त्या निविष्ठा वापरण्यास प्रोत्साहित करणे, ३) आपत्ती समयी शेतकऱ्यांना आर्थिक

स्थैर्य देण्यामध्ये मदत करणे, इत्यादी उद्देशाने ही योजना राबविली जाते. जेणेकरून शेतीचा व पर्यायाने राज्याचा विकास होण्यास मदत होईल.

**सूक्ष्म सिंचन योजना :**

राज्यातील कृषी प्रामुख्याने मोसमी पावसावर अवलंबून आहे. राज्यामध्ये वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार १८ टक्के क्षेत्र ओलिताखाली आहे. त्यापैकी ५० टक्के वाटा भूगर्भातील पाण्याचा असून सुमारे २० लाख विहिरीमार्फत सिंचन केले जाते. भुगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये दिवसेंदिवस होत असलेली घट आणि पावसाचा अनियमितपणा यामुळे उपलब्ध पाण्याच्या साठ्याचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर करण्याकरिता ठिंबक व तुषार सिंचन योजना १९८६-८७ पासून राबविण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला या योजनेचे उद्देश उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, २) पाण्याची व विद्युत उर्जेची बचत करणे, ३) पिकाची उत्पादकता वाढविणे, ४) शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती उंचावणे इत्यादी उद्देश ठरविण्यात येऊन कृषी विकासाला चालना देण्यात आली.

**महाराष्ट्र सरकारच्या कृषी विकास व्यूहरचनेचा परिणाम :**

महाराष्ट्र सरकारने कृषीच्या विकासासाठी विविध व्यूहरचना धोरणे व योजना राबविल्या आहेत. आर्थिक सुधरणाकाळात राबविलेल्या व्यूहरचनेचा परिणाम पुढील तक्त्यावरून दिसून येते.

**महाराष्ट्राच्या उत्पन्नाचा आणि कृषीचा वृद्धिदर**

**(टक्केमध्ये)**

| वर्ष | महाराष्ट्राच्या उत्पन्नाचा वृद्धीदर | राज्याच्या कृषी उत्पन्नाचा वृद्धीदर |
|---|---|---|
| १९९१-९२ | २.९६ | -१.१५ |
| १९९५-९६ | १३.६१ | ११.२८ |
| २०००-०१ | ४.०५ | -४.५९ |
| २००५-०६ | १३.३५ | ९.२० |
| २०१०-११ | ११.२६ | २०.९५ |
| २०१३-१४ | ८.७१ | ३.९ |

Planning commission of India - State wise sector wise annual growth rate Databook.

वरील तक्त्यात वर्ष १९९१-९२ मध्ये महाराष्ट्राच्या उत्पन्नाचा वृद्धिदर २.९६ टक्के तर महाराष्ट्राच्या कृषी उत्पन्नाचा वृद्धीदर - १.१५ इतका होता तो २०००-०१ मध्ये अनुक्रमे ४.०५, -४.५९ इतका तर २०१०-११ मध्ये त्यात वाढ होऊन महाराष्ट्राच्या उत्पन्नाचा वृद्धीदर आणि राज्याच्या कृषी उत्पन्नाचा वृद्धीदर अनुक्रमे ११.२६, २०.९५ इतका झाला तर वर्ष २०१३-१४ मध्ये त्यात घट होऊन अनुक्रमे ८.७१ व ३.९ इतका झाला.

थोडक्यात सरकारने विविध व्यूहरचना राबवल्यामुळे कृषी उत्पन्नातील वृद्धीदरात वाढ घडून आली मात्र ही वाढ अस्थिर असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राच्या कृषी विकास व्यूहरचनेत कृषीच्या सिंचनाचे प्रमाण वाढवण्यासाठी योजना राबविण्यात आलेली आहे. त्या योजनेचा परिणाम पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेले आहे.

**राज्यातील सिंचनाची स्थिती (क्षेत्र हजार हेक्टरमध्ये) (दशकनिहाय)**

| वर्ष | विहिर सिंचन | इतर स्त्रोत | निव्वळ सिंचन क्षेत्र | एकूण सिंचन क्षेत्र | पिकाखालील क्षेत्र | स्थूल सिंचित क्षेत्राची पिकखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १९६०-६१ | ५१५ | ४७७ | १०७२ | १२२० | १८८२३ | ६.५ |
| १९७०-७१ | ७६८ | ५७९ | १३४७ | १५७० | १८७३७ | ८.४ |
| १९८०-८१ | १०५५ | ७८० | १८३५ | २४१५ | १९६४२ | १२.३ |
| १९९०-९१ | १६७२ | ९९९ | २६७१ | ३३१९ | २१८५९ | १५.२ |
| २०००-०१ | २२६२ | ९८७ | ३२४९ | ३८५२ | २१६११ | १७.८ |
| २०१०-११ | २१५९ | ११६२ | ३३२१ | ४०५० | २२६१२ | १७.९० |

**स्त्रोत :** महाराष्ट्राचे विविध आर्थिक पाहणी अहवाल अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

वरील तक्त्यात राज्याच्या सिंचनाची स्थिती दर्शविली असून वर्ष १९६०-६१ मध्ये स्थूल सिंचित क्षेत्राची पिकाखाली स्थूल क्षेत्राशी टक्केवारी ६.५ टक्के इतकी होती त्यात वाढ होऊन वर्ष १९९०-९१ मध्ये १५.२ टक्के तर २०१०-११ मध्ये १७.९० टक्के इतकी झाली.

थोडक्यात सिंचनाच्या स्थितीत १९६०-६१ पासून सतत वाढ होत असल्याचे दिसून येते.

**सारांश :**

महाराष्ट्र सरकारने कृषी विकासासाठी अनेक व्यूहरचना धोरणे व योजना राबविलेल्या आहेत पण कृषी विकासाचा विचार केला असता कृषीच्या उत्पन्नातील वृद्धिदरात अस्थिरता असल्याची दिसून आली तर सिंचनाच्या प्रमाणात मात्र वाढ होत असलेली दिसून आलेली आहे. तसेच उत्पादनाचा विचार केला असता वर्ष १९९०-९१ मध्ये एकूण अन्नधान्य २३४४ मेट्रीक टन इतके तर वर्ष २०११-१२ मध्ये त्यात वाढ होऊन २४४० मेट्रीक टन इतके झाल्याचे दिसून आले आहे. म्हणजेच कृषी उत्पादनात वाढ घडून आलेली आहे. जरी ही वाढ दिसून येत असली तरी वाढत्या लोकसंख्येच्या मानाने कृषी अन्नधान्याची होणारी वाढ यामध्ये खूप तफावत असल्याचे दिसून येते. कारण वर्ष १९९०-९१ मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या ७.८९ कोटी इतकी होती ती २०११ मध्ये ११.२४ कोटी इतकी झाली. म्हणजेच ही वाढ अन्नधान्य उत्पादन वाढीच्या तुलनेत खुप जास्त आहे.

म्हणून खऱ्या अर्थाने कृषीचा विकास करण्यासाठी सरकारला विविध धोरणे व व्यूहरचना राबवून त्याची योग्य अंमलबजावणी करावी लागते. तरच कृषीचा विकास होईल.

संदर्भ :

१) Nadkarni M.V. (१९९३) Agricultural Policy in India, Department of Economic Analysis and Policy, Reserve Bank of India, Bombay, p. ३५

२) Bajapai, S. (२००८), Management of Agricultural at product, New Delhi, Cyber Tech. Publication p.३२

३) Maharashtra Biotechnology Policy (२००१), Departement of Agricultural Maharashtra, Mumbai.

४) महाराष्ट्र राज्याची जलनिती (२००३) पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. २२

५) महाराष्ट्र शासन शेतकरी मासिक (२०१२) अंक ३ रा, वर्ष १३ वे, पृ. २४.

६) Raul, Chhabilendra (२००१) Bitter to Better Harvest post green Revoluation Agricultural and Marketing Strategy for India, Nothern Book, center, New Delhi, p. २७७

७) Bhattacharya B, (२००४), Agricultural state of the Indian Farmer, Vol. १८ Department of Agricultural and Co-operations ministry of Agriculture, Government of India, New Delhi, p. ६९